# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.

दिनांक 27/04/2020 (सोमवार)
(सकाळ)

### पोस्टे भिवापुर येथे विदेशी दारू बाळगुन विक्री करणाऱ्या आरोपीस अटक
### स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई
### एकुण 1,28,000/- चा माल मुद्देमाल जप्त

दिनांक 06/05/2020 रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक हे पो.स्टे. भिवापुर हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना मुखबीरद्वारे बातमी मिळाली की, आरोपी नामे- राजु नारायण मुट्टलवार, वय 38 वर्ष, रा. शिवाजी ले आउट, भिवापुर हा त्याचे राहते घरी विदेशी दारू बाळगुन विक्री करीत आहे. अश्या मिळालेल्या माहीतीवरून स्थानिक गुन्हे शाखेतील पथकाने दिनांक 06/5/2020 चे रात्री 01.00 वा. ते 02.30 वा. दरम्यान नमुद आरोपी चे घरी छापा घातला असता त्याचे घरी वेगवेगळया कंपनीच्या विदेशी दारू किंमती 1,28,000/- चा माल आरोपीचे ताब्यातुन जप्त केला.

सदर प्रकरणात पोस्टे भिवापुर येथे आरोपीविरूध्द कलम 65(फ) महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हयातील आरोपी राजु नारायण मुट्टलवार, वय 38 वर्ष, रा. शिवाजी ले आउट भिवापुर यास अटक करण्यात आली आहे. पुढील कारवाई करीता पो स्टे भिवापुर यांना देण्यात आले.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अप्पर पोलीस अधिक्षक मोनिका राऊत यांचे मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार यांचे नेतृत्वात सपोनि श्री. वैरागडे, पोलीस हवालदार संतोष पंधरे, मदन आसतकर, पोलीस शिपाई राधेश्याम कांबळे, चालक भाउराव खंडाते यांचे पथकाने केली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर